BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

सार्वजनिक वित्त, राजकोषीय धोरण आणि कर रचना

संशोधक

डॉ. रूपाली पळससरामजी कांबळे

सहाय्यक प्राध्यापक (C.H.B)

अर्थशास्त्र विभाग

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती. (स्वायत्त)

E.mail -rupalikamble081@gmail.com

सारांश (Abstract)

आधुनिक काळात सार्वजनिक म्हणजे सरकारी खर्च व उत्पन्न प्रचंड प्रमाणात वाढल्यामुळे त्यांचे स्वतंत्र शास्त्र हृदयास आले त्या शास्त्राला सार्वजनिक वित्त असे म्हणतात सरकारच्या वित्तीय व्यवहाराचा अभ्यास म्हणजे सार्वजनिक वित्त होय सार्वजनिक वित्त मध्ये सरकारचे उत्पन्न व सरकारच्या खर्चाचा समावेश होतो सरकारचे कर रचना करेत्तर महसूल प्राप्ती सार्वजनिक खर्च सार्वजनिक कर्ज अर्थसंकल्प वित्तीय तूट आणि केंद्र राज्य आर्थिक संबंध इत्यादीचा अभ्यास सार्वजनिक वित्त यामध्ये केला जातो.

सरकार आपले राजकोषीय धोरण आपल्या जमाखर्चाचे वार्षिक विवरण पत्रक मांडून जाहीर करते अशा वार्षिक विवरण पत्राला सरकारचा अर्थसंकल्प असे म्हणतात राजकोषीय धोरणाचा मुख्य उद्देश म्हणजे रोजगार निर्मिती करणे किंमत स्थैर्य राखणे उत्पन्नाचे पुनर्वितरण करणे आणि सामाजिक कल्याण राखणे हा आहे.

भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये करव्यवस्था ही सार्वजनिक महसूल प्राप्तीचा महत्त्वाचा स्त्रोत आहे यामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कराचा समावेश होतो जीएसटी (GST) Goods and service tax यांनी कर रचनेत महत्त्वाचे बदल घडून आणले आहेत. त्याचबरोबर सार्वजनिक भांडवली खर्च, पायाभूत सुविधा ,आरोग्य शिक्षण ,सामाजिक सुरक्षा, कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान यांना विकास प्रक्रियेत विशेष महत्त्व प्राप्त होते. बजेट 2026 27 मध्ये केंद्र सरकारने 44.04 लाख कोटी इतका gross tax revenue अंदाजीत केला असून तो revised estimate 2025-26 पेक्षा आठ टक्के अधिक आहे. यामध्ये प्रत्यक्ष कर 26.07 लाख कोटी आणि अप्रत्यक्ष कर 17.01 लाख कोटी असा अंदाज आहे. केंद्राचा fiscal deficit FY 2026-27 मध्ये GDP च्या 43% इतका अंदाजीत करण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधन लेखांमध्ये सार्वजनिक वित्ताची संकल्पना, राजकोषीय धोरणाची उद्दिष्टे व साधने, भारतीय करव्यवस्था, जीएसटी ,सार्वजनिक खर्च ,वित्तीय तूट, सार्वजनिक कर्ज, केंद्र राज्य आर्थिक संबंध ,आणि वित्तीय शाश्वतता यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

बीज शब्द:-सार्वजनिक वित्त, fiscal policy, कर रचना, budget ,GST public revenue, fiscal deficit, public debt, वित्तीय शाश्वतता.

प्रस्तावना

सरकारच्या उत्पन्न आणि खर्चाची व्यवस्था म्हणजे सार्वजनिक वित्त होय. यात केंद्र सरकार ,राज्य सरकार, स्थानिक सरकार,तसेच इतर सहकारी संस्था, यांच्या व्यवहाराचा अभ्यास केला जातो. सरकारची अव्ययाची साधने कोणती आणि खर्च करण्याचे क्षेत्रे कोणती याचा अभ्यास सार्वजनिक राजस्व किंवा लोकवित्त यामध्ये केला जातो .म्हणून सरकारच्या उत्पन्नाचे व खर्चाचे अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे सार्वजनिक अर्थशास्त्र होय

व्याख्या

1) **ह्यारोल्ड ग्रीव्हज यांच्या मते:**- "संघराज्य सरकार, घटक राज्य सरकार, आणि स्थानिक सरकार ,यांच्या उत्पन्नाची आणि खर्चाची चिकित्सा करणारी अभ्यास शाखा म्हणजेच सार्वजनिक आयुर्वेद होय."

2) **श्री बॅस्टल यांच्या मते:**-" सार्वजनिक वित्त राज्याच्या सार्वजनिक सत्तांचे खर्च व उत्पन्न आणि त्यांच्या परस्पर संबंध हाताळणे. तसेच वित्तीय व्यवस्था व नियंत्रण हाताळणे."

"Public finance deals with expenditure and income of public authorities of the state and their mutual relation also with the financial administration and Central."

सार्वजनिक अर्थशास्त्र ही शाखा सार्वजनिक सत्तेच्या सरकारची प्राप्ती व खर्च यांचा अभ्यास करते .तसेच सार्वजनिक सत्तेच्या प्राप्ती व खर्चात कसा मिळ घालता येईल याचाही अभ्यास करते .सार्वजनिक अर्थव्यवहारांमध्ये सार्वजनिक खर्च, सार्वजनिक उत्पन्न, सार्वजनिक कर्ज ,अर्थ विषयक व्यवस्था, संघराज्य व्यवस्था, आर्थिक वृद्धी, इत्यादीचा समावेश होतो. पूर्वी सार्वजनिक व्यवहाराचे क्षेत्र संकुचित होते. परंतु सध्या सार्वजनिक अर्थव्यवहाराचे क्षेत्र व्यापक बनले असून आज असे मान्य केले जाते की सार्वजनिक अर्थव्यवहाराद्वारे सामाजिक अन्याय दूर करून किंवा टाळून देशात पूर्ण रोजगाराची परिस्थिती निर्माण करता येणे शक्य आहे.

सार्वजनिक वित्ताची प्रमुख वैशिष्ट्ये व व्याप्ती.

1) सार्वजनिक उत्पन्न(public revenue) सरकारला कर(income tax GST.) इत्यादी विनाकार उत्पन्न शुल्क आणि दंडाद्वारे जे उत्पन्न मिळते त्यांचा यात समावेश होतो.

2) सार्वजनिक खर्च:- (public expenditure) देशाची संरक्षण व्यवस्था ,शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा,(रस्ते रेल्वे)आणि कल्याणकारी योजना, वर सरकार जो खर्च करते त्याला सार्वजनिक खर्च असे म्हणतात.

3) सार्वजनिक कर्ज:-(public debt) जेव्हा सरकारचा खर्च उत्पन्नापेक्षा जास्त होतो तेव्हा सरकारला देशांतर्गत किंवा परदेशातून कर्ज घ्यावे लागते.

4) वित्तीय प्रशासन व अर्थसंकल्प:- (budget) सरकारच्या वार्षिक जमाखर्चाचा ताळेबंद म्हणजेच अर्थसंकल्प (budget)तयार करणे आणि त्याचे नियोजन करणे.

5) आर्थिक स्थिरीकरण :-देशात मंदी किंवा महागाई नियंत्रित ठेवणे .आणि संपत्तीचे व उत्पन्नाचे योग्य वाटप करणे हे सार्वजनिक वित्ताचे मुख्य उद्दिष्ट असते.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

संशोधनाची उद्दिष्टे

1) सार्वजनिक वित्ताची संकल्पना स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करणे.

2) राजकोषीय धोरण सविस्तर स्पष्ट करणे.

3) भारतातील कर रचनेचा अभ्यास करणे.

4) केंद्रीय अर्थसंकल्प 2026- 27 मधील महत्त्वाच्या वित्तीय निर्देशकाचे विश्लेषण करणे.

संशोधनाची गृहितके

1) सार्वजनिक खर्चाचा आर्थिक विकासावर महत्त्वपूर्ण परिणाम होतो.

2) न्याय करव्यवस्था सरकारच्या महसुली क्षमतेत वाढ करते.

3) अति जास्त वित्तीय तूट आणि सार्वजनिक कर्जामुळे वित्तीय व्यवस्थेवर दबाव निर्माण होतो.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन लेखासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे संशोधन ना करिता दुय्यम माहितीचा आधार घेतला आहे.

सार्वजनिक वित्त संकल्पना स्वरूप व व्याप्ती

आधुनिक काळात सार्वजनिक म्हणजे सरकारी खर्च आणि उत्पन्न प्रचंड प्रमाणात वाढल्यामुळे त्यांचे स्वतंत्र शास्त्र उदयास आले असून ते सतत विकसित होत आहे .त्या शास्त्राला सार्वजनिक अर्थशास्त्र किंवा सार्वजनिक वित्त असे म्हणतात. सार्वजनिक वित्त ही अर्थशास्त्राचे महत्त्वाची शाखा आहे.

आधुनिक जगात सार्वजनिक सत्ता किंवा सरकार ही देशातील अत्यंत महत्त्वाची आर्थिक संस्था आहे सरकारला विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात त्यासाठी खर्च करावा लागतो. आणि उत्पन्नही मिळवावे लागते .सरकार हे उत्पन्न नागरिकांच्या उत्पन्नातून विविध मार्गाने काढून घेत असते .तसेच सरकारने केलेला खर्च हा देखील नागरिकांच्या उत्पन्नावर परिणाम करणारा असतो. त्यामुळे सरकारचे उत्पन्न आणि खर्च ही संपूर्ण आर्थिक व्यवस्थेवर परिणाम घडवून आणणारी एक सार्वजनिक कृती आहे.

सार्वजनिक वित्ताची प्रमुख कार्य

1) संसाधनाचे वाटप :-रस्ते ,सिंचन, शिक्षण, आरोग्य, आणि वाहतूक यासारख्या क्षेत्रासाठी संसाधने उपलब्ध करून देणे.

2) उत्पन्नाचे पुनर्वितरण:- कर आकारणी आणि सामाजिक कल्याण योजनाद्वारे आर्थिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न करणे.

3) आर्थिक स्थैर्य:- आर्थिक मंदी, मागणीतील घट, आणि बेरोजगारी यांचा सामना करण्यासाठी वित्तीय उपयोजना करणे.

4) आर्थिक विकास:- पायाभूत सुविधा आणि उत्पादक क्षेत्रात गुंतवणूक करून खाजगी गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करणे.

5) सामाजिक कल्याण:- दुर्बल घटकांना सार्वजनिक सेवा आणि आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून देणे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

सार्वजनिक वित्ताचे स्वरूप

1) **सार्वजनिक वित्ताचे सामूहिक स्वरूप:**- सार्वजनिक वित्ताचा संबंध संपूर्ण समाजाच्या आर्थिक गरजांशी असतो संरक्षण, सार्वजनिक रस्ते, सार्वजनिक आरोग्य, आणि शिक्षण, यासारख्या सेवाच समाजातील अनेक व्यक्तींना लाभ होतो.

2) **शासनाच्या उत्पन्नाशी संबंधित स्वरूप:**- सरकारला विविध सार्वजनिक कार्य पार पाडण्यासाठी आर्थिक संसाधनाची आवश्यकता असते .यासाठी सरकार पुढील स्त्रोतांचा वापर करते. प्रत्यक्ष कर- आयकर, कंपन्यावरील कर ,

अप्रत्यक्ष कर- वस्तू व सेवा कर, (जीएसटी) सीमा शुल्क,

करेतर महसूल -, शुल्क, दंड, व्याज, आणि सार्वजनिक उपक्रमांमधील लाभांश.

सार्वजनिक कर्ज आणि इतर प्राप्ती.

3) **सार्वजनिक खर्चाचे स्वरूप:**- सार्वजनिक वित्तामध्ये शासनाच्या खर्चाचा अभ्यास केला जातो. सार्वजनिक खर्चाचे प्रमुख प्रकार आहे.

3.1) **विकासात्मक खर्च** -प्रशासकीय खर्च, शिक्षण आणि आरोग्यावरील खर्च, संरक्षणावरील खर्च ,पायाभूत सुविधा वरील खर्च ,सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी योजना वरील खर्च.

4) **सामाजिक कार्याभिमुख स्वरूप**- सार्वजनिक वित्ताचा एक महत्त्वाचा उद्देश सामाजिक कल्याण वाढविणे हा आहे. गरीब ,वंचित आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकासाठी विविध योजना राबवून सामाजिक न्याय साधण्याचा प्रयत्न केला जातो.

5) **आर्थिक विकासाचे स्वरूप:**- सरकार रस्ते ,रेल्वे, सिंचन ,ऊर्जा ,शिक्षण, आणि आरोग्य क्षेत्रात गुंतवणूक करतो.

6) **अर्थसंकल्पीय स्वरूप:**- अर्थसंकल्प हा सार्वजनिक वित्ताचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामध्ये शासनाचा अपेक्षित उत्पन्नाचा आणि नियोजन खर्चाचा तपशील दिला जातो.

सार्वजनिक वित्ताची व्याप्ती

सार्वजनिक वित्त हे अर्थशास्त्राचे एक महत्त्वाचे उपक्षेत्र आहे .सार्वजनिक वित्तांमध्ये शासनाचे उत्पन्न ,सार्वजनिक खर्च ,सार्वजनिक कर्ज, अर्थसंकल्प ,कर व्यवस्था, आणि वित्तीय धोरण, यांचा अभ्यास केला जातो .आधुनिक कल्याणकारी राज्यात आर्थिक स्थैर्य राखणे ,यासाठी सार्वजनिक वित्ताला विशेष महत्त्व आहे .सार्वजनिक वित्ताच्या व्याप्तीमध्ये पुढील घटकांचा समावेश होतो.

1) सार्वजनिक उत्पन्न (public revenue) सार्वजनिक उत्पन्नाचे स्त्रोत.

कर महसूल ,करे तर महसूल, इतर प्राप्ती याद्वारे सार्वजनिक उत्पन्न प्राप्त होते.

2) सार्वजनिक खर्च (public expenditure) सार्वजनिक खर्चात संरक्षण आणि प्रशासन ,शिक्षण आणि आरोग्य, रस्ते ,रेल्वे ,सिंचन व ऊर्जा ,कृषी आणि ग्रामीण विकास ,सामाजिक सुरक्षा, व कल्याणकारी योजना, पर्यावरण संरक्षण ,आणि सार्वजनिक सुविधा इत्यादीचा समावेश होतो.

3) सार्वजनिक कर्ज:-(public debt) सार्वजनिक कर्जामध्ये अंतर्गत व बाह्य कर्ज घेण्याची कारणे, कर्जाच्या उत्पादक व्यापार, व्याज देयके, आणि कर्जफेड ,सार्वजनिक कर्जाचे आर्थिक स्थैर्यावर होणारा परिणाम इत्यादीचा समावेश होतो.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

4) अर्थसंकल्प:-(budget) अर्थसंकल्पात महसुली व भांडवली प्राप्ती, महसुली व भांडवली खर्च, राजकोषीय तुट,आणि महसुली तूट, अर्थसंकल्पीय नियोजन, आणि नियंत्रण, अर्थसंकल्पाची अंमलबजावणी आणि लेखापरीक्षण इत्यादीचा समावेश होतो

5) कर व्यवस्था:-(taxation) प्रत्यक्ष कर, आयकर कंपन्यावरील कर इत्यादी

अप्रत्यक्ष कर जीएसटी आणि सीमा शुल्क.

6) राजकोषीय धोरण:-(fiscal policy) राजकोषीय धोरणामध्ये आर्थिक विकासाला चालना देणे ,रोजगार निर्मिती करणे ,आर्थिक स्थैर्य राखणे, उत्पन्नातील विषमता कमी करण्याचा प्रयत्न करणे, महागाई आणि आर्थिक मंदींना प्रतिसाद देणे, इत्यादी.

7) वित्तीय प्रशासन:-यामध्ये सरकारच्या आर्थिक व्यवहारांचे नियोजन अंमलबजावणी नियंत्रण आणि मूल्यमापन यांचा अभ्यास होतो.

8) आर्थिक स्थैर्य व विषमता:-सार्वजनिक वित्ताचा उपयोग अर्थव्यवस्थेतील चढ-उतार कमी करणे आणि विकासाला चालना देणे.

राजकोषीय धोरण

राजकोषीय धोरण म्हणजे सरकारने कर सार्वजनिक खर्च आणि कर्ज यांच्या साह्याने अर्थव्यवस्थेतील एकूण मागणी उत्पादन ,रोजगार, आणि उत्पन्न वितरणावर प्रभाव टाकण्यासाठी स्वीकारलेले धोरण आहे .राजकोषीय धोरण म्हणजे अपेक्षित उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी सार्वजनिक आय आणि खर्च यामध्ये परिवर्तन करणे होय.

राजकोषीय धोरणाची प्रमुख साधने

1) कर धोरण-करांचे दर व्याप्ती व सवलती निश्चित करणे.

2) सार्वजनिक खर्च-सरकारी खर्चाचे प्रमाण व प्राधान्यक्रम ठरविणे.

3) सार्वजनिक कर्ज-सरकारी तूट भरून काढण्यासाठी कर्ज उभारणे.

4) अनुदाने -विविध वस्तू सेवा किंवा घटकांना आर्थिक मदत करणे.

5) वित्तीय हस्तांतरण- केंद्राकडून राज्यांना संसाधनाचे वितरण करणे.

6) वित्तीय तूट व्यवस्थापन- उत्पन्न व खर्च यांच्यातील अंतर नियंत्रित करणे.

राजकोषीय धोरणाची उद्दिष्टे

देशाच्या अर्थव्यवस्थेवर योग्य परिणाम घडवून आणण्याचे एक महत्त्वाचे साधन म्हणून राजकोषीय धोरणाला विशेष स्थान आहे. हे लक्षात घेता राजकोष्य धोरणाची उद्दिष्टे स्पष्टपणे मांडणे आवश्यक आहे.

1) पूर्ण रोजगाराच्या पातळीवर आर्थिक स्थैर्य राखणे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

2) व्यापार चक्रे रोखून तेजी-मंदी आळा घालने.

3) आर्थिक वृद्धीचा दर सतत वाढता ठेवून सतत आर्थिक विकास करणे.

राजकोषीय धोरणाचे प्रकार

1) विस्तारवादी राजकोषीय धोरण:-आर्थिक मंदी किंवा मागणीतील कमतरतेच्या काळात खर्च वाढवणे अथवा कारभार कमी करणे.

2) अंकुचनवादी राजकोषीय धोरण:-अति मागणी किंवा वित्तीय असंतुलनाच्या परिस्थितीत खर्च आणि महसूल यांचे पुनरसंतुलन करणे.

भारतातील राजकोषीय स्थिती

केंद्रीय अर्थसंकल्प 2026 -27 आणि अर्थ मंत्रालयाच्या राजकोषीय धोरणा धोरण विषयक निवेदनानुसार पुढील निर्देशक महत्त्वाचे आहे.

1) **प्रमुख राजकोषीय निर्देशक**

निर्देशक	**2025-26 (RE)**	**2026-27 (BE)**
1) राजकोषीय तूट	4.4%	4.3%
2) महसुली तूट	1.5%	1.5%
3) प्राथमिक तूट	0.8%	0.7%
4) एकूण कर महसूल	11.4%	11.2%
5) करेतर महसूल	1.9%	1.7%
6) केंद्र सरकारचे कर्ज	56.1%	55.6%

स्त्रोत-भारत सरकार statement of fiscal policy केंद्रीय अर्थसंकल्प 2026 -27

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

विश्लेषण

1) **राजकोषीय तूट**

GDP च्या तुलनेत 4.4% वरून 4.3% पर्यंत कमी होण्याचा अंदाज आहे यामुळे वित्तीय एकत्रीकरणाची दिशा दिसते मात्र प्रत्यक्ष परिणाम महसूल आणि खर्चाच्या अंमलबजावणीवर अवलंबून राहतील.

2) **महसुली तूट**

दोन्ही वर्षासाठी 1.5% असल्याने महसुली प्राप्ती आणि महसुली खर्च यांच्यातील कमी करण्याचे आव्हान आहे.

3) **प्राथमिक तूट**

0.8% वरून 0.7% पर्यंत घटण्याचा अंदाज प्राथमिक तूट ही व्याज देयके वगळून मोजली जाते.

4) **केंद्र सरकारचे कर्ज**

जीडीपीच्या तुलनेत 56% वरून 55.6% होण्याचा अंदाज आहे. कर्जाचे प्रमाण कमी होणे हे सकारात्मक वित्तीय संकेत असू शकते .तरीही कर्जाचा प्रत्यक्ष खर्च आणि व्याज देखे विचारात घेणे आवश्यक आहे.

5) **एकूण कर महसूल**

जीडीपीच्या तुलनेत 11.4% वरून 11.2% होण्याचा अंदाज असल्यामुळे नाममात्र कर महसूल वाढत असला तरी जीडीपीच्या तुलनेत प्रमाण किंचित कमी होऊ शकते.

भारताची कर रचना(Tax structure in India)

कर म्हणजे सरकारकडून सार्वजनिक कार्यासाठी कायद्याच्या आधारे आकारला जाणारा अनिवार्य आर्थिक भरणा होय. कराच्या माध्यमातून सरकार महसूल उभारते .आर्थिक वर्तनावर प्रभाव टाकते, आणि उत्पन्नाचे पुनर्वितरण करण्याचा प्रयत्न करते.

"जनतेच्या कल्याणासाठी शासनाला करावा लागणारा खर्च भागविण्याच्या उद्देशाने शासनाने लोकांकडून सक्तीने घेतलेली रक्कम म्हणजे कर होय"

भारतीय कर व्यवस्थेत केंद्र सरकार व राज्य सरकार यांना संविधानानुसार विविध कर आकारण्याचे अधिकार आहे.

कराची वैशिष्ट्ये

1) कर हे सक्तीचे देणे आहे. (Compulsory Levy)

2) कर उत्पन्नाचा वापर शासन सार्वजनिक खर्च करण्यासाठी करते.

3) सरकारने कराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मोबदला जनतेला दिला पाहिजे असे सरकारवर कोणतेही बंधन नसते.

4) घटनेच्या कलम 265 अंतर्गत सरकारला कर आकारण्याचा अधिकार आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

करांचे वर्गीकरण (Classification of tax)

1) प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर (Direct and indirect tax)

2) प्रमाणशीर प्रगतिशील अनेक प्रतिगामी कर. (Professional progressive and regressive tax)

3) विशिष्ट आणि मूल्यानुसार कर.(specificand advoloren taxes)

4) एक मुखी आणि बहुमुखी कर. (Single and multiply taxes)

5) मूल्यवर्धित कर.(value added tax) VAT

1) प्रत्यक्ष कर (Direct tax)

प्रत्यक्ष कराचा भार सामान्यता कर जात्यावरच पडतो.

1)वैयक्तिकआयकर, महामंडळकर ,संपत्ती वरील कर ,मालमत्ता कर.देणगीकर, संपत्ती कर.

2) कंपन्यावरील प्राप्ति कर.

3) भांडवली नफ्यावरील कर लागो कायद्यानुसार.

महत्व- प्रत्यक्ष करांमध्ये उत्पन्न किंवा नफा यांचा विचार करता येतो त्यामुळे करदात्यांच्या आर्थिक क्षमतेनुसार कारभार ठरविण्याचे साधन म्हणून त्याचा उपयोग होऊ शकतो.

2) अप्रत्यक्ष कर (indirect tax)

अप्रत्यक्ष कर वस्तू व सेवांचा पुरवठा विक्री किंवा आयातिशी संबंधित असतात. त्यांचा आर्थिक भार किमतीच्या माध्यमातून ग्राहकावरही पडू शकतो. महत्त्व -प्रत्यक्ष करामुळे मोठ्या प्रमाणात व्यवहारातून महसूल मिळवता येतो मात्र आवश्यक वस्तूवरील कराचा कमी उत्पन्न गटावर तुलनेने अधिक भार पडण्याची शक्यता आहे.

3) अबकारी कर - 1) केंद्रीय अबकारी कर

२)राज्य अबकारी कर

4) सीमा कर जकात कर:- आयात कर, निर्यात कर

5) विक्रीकर- केंद्रीय विक्रीकर ,राज्य विक्रीकर

6) सेवा कर- करमणूक कर वाहनावरील कर नोंदणी शुल्क इत्यादी

7) वस्तू व सेवा कर (GST)

कर महसुलाचे आकडेवारी केंद्रीय अर्थसंकल्प 2026-27

केंद्रीय अर्थसंकल्पातील अंदाजानुसार 2026 27 या आर्थिक वर्षात एकूण स्थूलकर महसूल रुपये ₹44.04 लाख कोटी अपेक्षित आहे यामध्ये प्रत्यक्ष करांचा वाटा रूप ₹26.97 लाख कोटी आणि प्रत्यक्ष करांचा वाटा ₹17.07 लाख कोटी आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

केंद्र सरकारचा अंदाजीत स्थूलकर महसूल

कर महसुलाचा प्रकार	रक्कम (रु. लाख कोटी)	एकूण कर महसुलातील वाटा
1) प्रत्यक्ष कर	26.97	61.2%
2) अप्रत्यक्ष कर	17.01	38.8%
3) एकूण स्थूलकर महसूल	44.04	100%

स्त्रोत-अर्थ मंत्रालय, केंद्रीय अर्थसंकल्प, 2026-27

आकडेवारीचे विश्लेषण

→प्रत्यक्ष करांचा 61.2% वाटा असल्यामुळे आयकर आणि कंपन्यावरील कर हे केंद्राच्या महसुलाचे महत्त्वाचे आधार आहेत.

→अप्रत्यक्ष करांचा 38.8% वाटा असल्यामुळे उपभोग आणि वस्तू सेवांच्या व्यवहारांशी संबंधित महसुली महत्त्वाचा आहे.

→.कर महसुलात वाढ झाली तर त्यातून आर्थिक न्याय साध्य झाला असे आपोआप म्हणता येत नाही. त्यासाठी करभाराचे वितरण ,कर सवलती, आणि सार्वजनिक खर्च लाभ कोणाला मिळतो यांचेही विश्लेषण करावे.

कर संकलन वाढविण्यासाठी कर आधार व्यापक करणे .डिजिटल अनुपालन सुधारणे ,आणि कर प्रशासन सुलभ करणे, आवश्यक आहे.

वस्तू व सेवा कर .जीएसटी ची भूमिका आणि परिणाम

1 जुलै 2017 पासून लागू झालेला वस्तू व सेवा कर हा भारतातील अप्रत्यक्ष कर व्यवस्थित महत्त्वाचा बदल आहे .या व्यवस्थेने अनेक केंद्रीय आणि राज्यस्तरीय अप्रत्यक्ष करांचे एकत्रीकरण केले.

जीएसटी चे प्रकार

1) CGST(केंद्राचा वस्तू व सेवा कर)

2) SGST(राज्याचा वस्तू व सेवा कर)

3)IGST आंतरराज्य पुरवठा आणि आयातीसाठी लागू होणारे एकत्रित कर रचना.

जीएसटी (GST) चे फायदे

1) अनेक अप्रत्यक्ष करांचे एकत्रीकरण करणे.

2) इनपुट टॅक्स क्रेडिट द्वारे करा वरील करांचा परिणाम कमी करण्याची व्यवस्था निर्माण करणे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

3) डिजिटल नोंदणी, विवरण पत्रे, आणि व्यवहारांचा मागोवा घेणे.

4) आंतरराष्ट्रीय व्यवहारातील कर प्रणालीचे सुसूत्रीकरण करणे.

5) औपचारिक अर्थव्यवस्थेतील व्यवहार व कर अनुपालनाला प्रोत्साहन देणे.

सार्वजनिक खर्च आणि आर्थिक विकास

केंद्रीय सरकारचा एकूण व भांडवली खर्च

निर्देशक	**अंदाजीत रक्कम**
1) एकूण केंद्रीय खर्च	₹ 53.47 लाख कोटी
2) भांडवली खर्च	₹12.22 लाख कोटी.
3) भांडवली मालमत्ता निर्मितीसाठी राज्यांना अनुदाने	₹4.93 लाख कोटी.
4) प्रभावी भांडवली खर्च	₹17.15 लाख कोटी
5) प्रभावी भांडवली खर्चाचे जीडीपी मधील प्रमाण	₹4.4%

स्त्रोत- भारत सरकार केंद्रीय अर्थसंकल्प 2026- 27

1)भांडवली खर्चाचे महत्त्व

रेल्वे ,रस्ते ,सिंचन, सार्वजनिक पायाभूत सुविधा ,आणि उत्पादक मालमत्ता मध्ये गुंतवणूक केल्याने वाहतूक खर्च कमी होणे, रोजगार निर्मिती आणि खाजगी गुंतवणुकीला चालना मिळणे शक्य आहे.

2) राजकोषीय तूट आणि सार्वजनिक कर्ज

सरकारच्या एकूण खर्चातून कर्जाव्यतिरिक्त एकूण प्राप्ती वजा केल्यावर मिळणारी तूट म्हणजे राजकोषीय तूट होय.

केंद्रीय अर्थसंकल्प 2026 27 मध्ये राजकोषीय तूट जीडीपीच्या 4.3% अपेक्षित आहे .केंद्र सरकारच्या कर्जाचे प्रमाण 2030 -31 पर्यंत 50% + 1.1 पर्यंत आणण्याचे उद्दिष्ट नमूद केले आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

केंद्र राज्य वित्तीय संबंध

1) केंद्रीय अर्थसंकल्प 2026 27 नुसार

2)राज्यांना कराचे वाटप ₹15.26 लाख कोटी अपेक्षित आहे.

3)वित्त आयोगाच्या अनुदानाची रक्कमर 1. 40 लाख कोटी अपेक्षित आहे.

4)करांचे वाटप आणि वित्त आयोगाची अनुदाने मिळून एकूण ₹16.56 लाख कोटी संसाधने राज्यांना हस्तांतरित होण्याचा अंदाज आहे.

5)विभाज्य कर संच यातील राज्यांना वाटा 41 %कायम ठेवण्याची शिफारस स्वीकारण्यात आली आहे.

संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष

सार्वजनिक वित्त राजकोषीय धोरण आणि कर रचना या संशोधन लेखाचे निष्कर्ष खालील प्रमाणे काढले आहेत.

1) सार्वजनिक वित्त हे आर्थिक विकास संसाधनाचे वाटपाने न्याय सामाजिक न्याय यांचे महत्त्वाचे साधन आहे.

2) 2026 -27 च्या अर्थसंकल्पात एकूण स्थूलकर महसूल रुपये ₹44.04 लाख कोटी अपेक्षित असून त्यात प्रत्यक्ष कराचा वाटा ₹61.2% आहे.

3) राजकोषीय तूट 4.3% अपेक्षित असल्यामुळे वित्तीय शिस्त राखण्याचा प्रयत्न दिसतो मात्र तूट किती आहे याबरोबरच तिच्या वित्त पुरवठ्याचा वापर कशासाठी होतो हेही महत्त्वाचे आहे.

4) जीएसटी आणि डिजिटल कर प्रशासनामुळे कर अनुपालन सोपे झाले आहे .परंतु लहान व्यवसायांचा अनुपालन खर्च कमी करणे आवश्यक आहे.

5) केंद्र राज्य वित्तीय हस्तांतरणे ही प्रादेशिक विकास आणि सार्वजनिक सेवा साठी महत्त्वाचे आहे.

शिफारसी (Recommendations)

1) आधार व्यापक करणे-कर अनुपालन वाढवणे ,अनावश्यक गुंतागुंत कमी करणे, आणि कर चुकवेगिरी, रोखण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

2) कर प्रणाली सुलभ करणे-विशेषता लघु आणि मध्यम उद्योगासाठी नियम, विवरणपत्रे ,आणि अनुपालन प्रक्रिया, अधिक सोप्या करणे.

3) सार्वजनिक खर्चाची गुणवत्ता वाढविणे- खर्चाच्या रकमेपेक्षा त्यातून निर्माण होणारे आर्थिक व सामाजिक परिणाम मोजणे.

4) उत्पादक भांडवली गुंतवणूक कायम राखणे.

5) पायाभूत सुविधा शिक्षण आरोग्य आणि कौशल्य विकास यासाठी दीर्घकालीन नियोजन करणे.

6) कर रचनेत न्यायता राखणे-प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांच्या वितरणात्मक परिणामांचे मूल्यमापन करणे आणि आवश्यकतेनुसार कर धोरणात सुधारणा करणे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

7) कर्ज व्यवस्थापनात सुधारणा करणे.

8) केंद्र राज्य समन्वय मजबूत करणे.

9) परिणाम आधारित अर्थसंकल्पाला प्रोत्साहन देणे.

संदर्भ ग्रंथ सूची

1) कोळंबे रंजन -भारतीय अर्थव्यवस्था, भागीरथ प्रकाशन पुणे 2005

2) पाटील जे .एफ.-सार्वजनिक अर्थकारण, फडके प्रकाशन कोल्हापूर 2011

3) डॉ. बोबडे प्रशांत ,डॉ.साबळे अविनाश.-सार्वजनिक अर्थशास्त्र, अथर्व पब्लिकेशन्स 2023

4) Government of India, ministry of finance, union budget 2026-27

5) Government of India ministry of finance statement of Fiscal policy under the fiscal responsibility and budget management act 2003 Feb 2026.

6) Musgrave R.A. and Musgrave P.B. Public finance in theory and practice, MC graw hill

7) अर्थ मंत्रालय, केंद्रीय अर्थसंकल्प, 2026-27